# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.01.2025** **वारःशनिवार**

---

1. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभुमीवर आज राष्ट्रपती देशाला करणार संबोधित,
2. पंतप्रधानांनी राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी, कलाकारांशी दिल्ली निवासस्थानी साधला संवाद
3. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष सुबियांतो यांचं चार दिवसांच्या भारतभेटीवर आगमन, प्रजासत्ताक दिनाला उपस्थित राहाणार
4. देशभरात आज 15 वा मतदार दिन साजरा होणार, दिल्लीत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम
5. नीती आयोगाच्या वित्तीय आरोग्य निर्देशांकात ओडिशा अव्वल स्थानी आणि
6. ज्येष्ठ निवृत्त न्यायामूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचं निधन
7. भारत-इंग्लड दरम्यान वीस षटकांच्या मालिकेतला दुसरा आज चेन्नईत

**<u>राष्ट्रपती प्रजासत्ताक</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला आज राष्ट्राला संबोधित करणार आहेत आकाशवाणीच्या राष्ट्रीय वाहिनीवरून तसेच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून संध्याकाळी सात वाजता त्याचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. त्यानंतर लगेचच राष्ट्रपतींच्या भाषणाचा इंग्रजी अनुवाद प्रसारीत केला जाईल. आकाशवाणीवर रात्री साडेनऊ वाजता प्रादेशिक वाहिन्यांवरून या भाषणाचा प्रादेशिक अनुवाद प्रसारित होणार आहे.

**<u>पंतप्रधान-संवाद</u>**

प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात सहभागी होत असलेले राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे एनसीसीचे छात्र, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, आणि चित्ररथांच्या कलाकारांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आपल्या निवासस्थानी संवाद साधला. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी सर्व नागरिकांनी अत्यंत जबाबदारीनं आपापली कर्तव्य पार पाडणं आवश्यक आहे, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. आपल्या देशातील विविधता आणि राष्ट्रीय एकता या मुद्द्यांवर त्यांनी भर दिला. सर्वच सहभागींनी विविध राज्यांच्या लोकांशी संवाद साधून एक भारत श्रेष्ठ भारत भावनेला बळकटी द्यावी असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>भारत-इंडोनेशिया</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यादरम्यान आज चर्चा होणार आहे. दोन्ही नेते द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेऊन परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करतील. यानंतर विविध करारांवर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. इंडोनेशियाच्या राष्ट्राध्यक्षांचं चार दिवसांच्या दौऱ्यावरकाल दिल्लीत आगमन झालं आहे. ते आज राजघाटावर जाऊन महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहातील. तसेच उपराष्ट्रपतींची भेट घेतील. संध्याकाळी ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार असून, ते उद्या दिल्लीत प्रजासत्ताक दिनाच्या

समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. राष्ट्रपतीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सुबियांतो यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. भारताच्या पुर्वेकडील देशांसंदर्भातल्या धोरणातला आणि इंडो पॅसिफिक क्षेत्रासंदर्भात इंडोनेशिया हा महत्त्वाचा देश आहे.

**शहा-मुंबई**

सहकार चळवळीच्या विस्तारासाठी शिस्त आणि व्यावसायिकता गरजेची असल्याचं मत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी काल मुंबईत व्यक्त केलं. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रत्येक व्यक्ती सहकारी चळवळीत जोडला जाऊन खऱ्या अर्थानं सहकारातून समृद्धी आणण्यासाठी प्रयत्न करू, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. येत्या अर्थसंकल्पात गुजरात मधले ज्येष्ठ सहकारी नेते त्रिभुवन दास पटेल राष्ट्रीय सहकार विद्यापीठाची घोषणा होईल, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी अमित शहा यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातील कार्यक्रमाची दिनदर्शिका, राष्ट्रीय शहरी सहकार वित्त आणि विकास महामंडळाच्या मुंबईतील कार्यालयाचं उद्घाटन झालं. सर्व शहरी सहकारी बँकांसाठी ही अग्रणी संस्था म्हणून काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

**मतदार दिवस**

आज देशभरात 15 वा राष्ट्रीय मतदान दिन साजरा केला जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम पार पडणार आहे. केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जूनराम मेघवाल यांच्यासह मुख्य निवडणूक आयुक्त, इतर राज्यांचे निवडणूक आयुक्त देखील कार्यक्रमाला उपस्थित राहाणार आहेत. जगभरातल्या निवडणूक व्यवस्थापनात येणाऱ्या मुख्य समस्यांवर चर्चा करण्यासाठी काल समारोप झालेल्या दोन दिवसीय परिषदेत उपस्थित राहिलेले निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे प्रमुख आणि प्रतिनिधीही या कार्यक्रमाला उपस्थित राहाणार आहेत. मतदार दिवसाची यंदाची संकल्पना मतदानासारखे काहीच नाही, मी निश्चित मतदान करणार अशी आहे. या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी केलेल्या अनुकरणीय प्रयत्नांसाठी राज्य आणि जिल्हा अधिकाऱ्यांना सर्वोत्तम निवडणूक पद्धती पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**नीती आरोग्य अहवाल**

नीती आयोगाने काल दिल्लीत यावर्षीचा वित्तीय आरोग्य निर्देशांक जारी केला. त्यानुसार, 18 प्रमुख राज्यांमध्ये वित्तीय आरोग्याच्या बाबतीत ओडिशा राज्यानं बाजी मारत अव्वल स्थान मिळवलं आहे. ओडिशानं 67 पूर्णांक 8 दशांश गुण मिळवले आहेत. त्यानंतर छत्तीसगड, गोवा यांचा क्रमांक लागतो. आघाडीची राज्यांचं वित्तीय आरोग्य मजबूत असल्याचं अहवालात नमूद केलं आहे. महसूल एकत्रीकरण, खर्च व्यवस्थापन आणि कर्ज शाश्वतता यामध्ये या राज्यांची उत्कृष्ट कामगिरी नोंदवली गेली आहे. यामध्ये वित्तीय दूरदर्शित्व आणि कर्ज शाश्वतता मजबूत झाल्यानं झारखंड राज्याच्या वित्तीय आरोग्यात सुधारणा दिसून येत आहे तर खर्च गुणवत्ता, कर्ज व्यवस्थापनातल्या कमकुवत कामगिरीमुळे कर्नाटक राज्याच्या वित्तीय आरोग्यात घसरण झाल्याची नोंद अहवालात नमूद केली आहे. विशिष्ट वित्तीय आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी लक्ष्यित सुधारणांची आवश्यकता या ही आंतरराज्यीत असमानतेतून अधोरेखित होत असल्याचंही अहवालात म्हटलं आहे. या अहवालाचं प्रकाशन 16 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉक्टर अरविंद पनगढिया यांच्या हस्ते झालं. त्यावेळी त्यांनी संतुलित प्रादेशिक विकास, दीर्घकालीन वित्तीय शाश्वतता आणि विवेकी प्रशासनासाठी राज्यांनी स्थिर वित्तीय मार्गाचा अवलंब करण्याची गरज अधोरेखित केली.

**वैष्णव**

जगाला भारताकडे आकर्षित करण्यात विश्वास आणि बुद्धीमत्ता हे दोन घटक सर्वात महत्त्वाचे घटक असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. स्वित्झर्लंडमधील दावोस इथं जागतिक आर्थिक मंचामध्ये ते वार्ताहरांशी संवाद साधत होते. सध्या जगासमोर सर्व अडचणी, समस्या असूनही बौद्धीक संपदा हक्कांचा आदर करणार अतिशय विश्वासार्ह देश म्हणून भारत उदयाला आला असल्याचं वैष्णव म्हणाले. भारतानं सर्व परिस्थितीत शांतता, सर्वांची वाढ आणि सर्वसमावेशक विकास यांच्यावर विश्वास असलेला देश ही प्रतिमा जगासमोर ठेवण्यात यश मिळवले आहे. जागतिक कंपन्या भारताविषयी आशावादी आणि उत्साहित आहेत. तसंच भारतात विस्तार करण्याचा विचार कर असून, नव्या कंपन्याही भारतात उद्योग सुरू करण्यास इच्छुक असल्याचंही वैष्णव म्हणाले.

**त्रिपुरा स्टार्टअप**

देश आणि राज्याची प्रगती ही तरुणांच्या प्रगतीवर अवलंबून असल्याचं प्रतिपादन त्रिपुराचे मुख्यमंत्री प्राध्यापक डॉक्टर माणिक साहा यांनी केलं आहे. आगरतळा इथं कार त्रिपुरा स्टार्टअप धोरणाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. तरूण हे राष्ट्र आणि राज्याची खरी संपत्ती आहे, पंतप्रधानही तरुणाईच्या शक्तीवर भर देतात आणि पारंपरिक नोकऱ्यांपलीकडचा विचार करून कमाईवर करण्यासाठी प्रोत्साहित करतात असंही साहा म्हणाले.

**छापे**

मुंबई आणि जयपूर मध्ये अवैध आर्थिक व्यवहार प्रतिबंध कायद्या अंतर्गत सक्तवसुली संचलनालयानं 13 ठिकाणी छापे टाकले. प्लॅटिनम हर्न या खाजगी कंपनीमार्फत राबवल्या जाणाऱ्या फसव्या गुंतवणूक योजना उघडकीस आल्यामुळे हे छापे टाकण्यात आले. कंपनीनं दागिने आणि रत्नांच्या गुंतवणुकीवर दोन ते नऊ टक्के साप्ताहिक परतावा देण्याचं आश्वासन देऊन गुंतवणुकदारांची दिशाभूल केल्याचा आरोप असून संबंधित बँक खात्यातील 21 कोटी 75 लाख रुपये गोठवले गेले आहेत.

**नरेंद्र चपळगावकर**

जेष्ठ निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचं आज सकाळी छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं. ते 88 वर्षांचे होते. मराठी शिक्षक म्हणून कारकीर्दीला सुरूवात केल्यानंतर 70 च्या दशकात त्यांनी बीड इथं वकिलीला सुरूवात केली. 80 च्या दशकात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. वर्धा इथल्या 96 व्या अखिल भारतीय साहित्य संमनेलाचे ते अध्यक्ष होते. कायदा आणि माणूस, विधीमंडळ आणि न्यायसंस्था सारखी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 1999 साली निवृत्त झाल्यानंतरही ते साहित्य क्षेत्रात अखेरपर्यंत कार्यरत राहिले. चपळगावकर यांच्या पार्थिव देहावर आज छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**क्रिकेट**

पुरूष क्रिकेटच्या वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील इंग्लंडविरूद्धचा दुसरा सामना आज चेन्नईत होणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. सूर्यकुमार यादव च्या नेतृत्वाखालील संघानं मालिकेतला पहिला सामना सात गडी राखून जिंकला होता.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.